# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना व प्रशासन विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

email :- registrar@unigug.ac.in दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३१०४ email:- establishment.section@unigug.ac.in


जा.क्र. गो.वि./आस्था./८२२/२०२२ दि.०८/०३/२०२२

## परिपत्रक

विषय :- महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था, पुणे व आयसर पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित प्रशिक्षण कार्यक्रमात सहभाग घेणेबाबत.

संदर्भ :- सहसंचालक कार्यालय, नागपूर विभाग नागपूर यांचे पत्र जाक्र उशिनाग/आस्था/सुचना/५८८/२०२२, दि. ०९/०२/२०२२.

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, संदर्भिय पत्रानुसार उपरोक्त विषयाबाबत उच्च व तंत्र शिक्षण शासन निर्णय दि. ०८/०३/२०१९ मध्ये विद्यापीठे/महाविद्यालये/शैक्षणिक संस्था मधील नवनियुक्त सहाय्यक प्राध्यापकांची १ महिना कालावधीचा Induction Programme मध्ये सहभाग नोंदवून पुर्ण करणेबाबत नमुद आहे. तसेच सदरचा Induction Programme हा UGC/HRDC मार्फत आयोजित करण्यात येत असलेल्या उद्‌बोधन वर्गाशी समकक्ष समजून त्यास कॅस योजनेतंर्गत स्थाननिश्चितीसाठी ग्राह्य धरणेबाबत तरतूद नमुद आहे.

तथापि महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था, पुणे व आयसर पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित प्रशिक्षण कार्यक्रमात सहभाग घेणेबाबत प्रस्तुत विभागातील वरिष्ठ महाविद्यालयातील शास्त्र शाखेतील विषय शिकविणाऱ्या शिक्षकांचा अल्प प्रतिसाद दिसून येत असल्याने उच्च शिक्षण संचालनालय पुणे यांनी महाविद्यालयांतील शास्त्र शाखेतील विषय शिकविणाऱ्या शिक्षकांनी उपरोक्त उल्लेखित प्रशिक्षण वर्गास जास्तीत जास्त संख्येने सहभाग घेण्याबाबत सुचना दिलेल्या आहेत.

त्याअनुषंगाने संदर्भिय पत्राचे अवलोकन करुन त्यानुसार शास्त्र शाखेतील विषय शिकविणाऱ्या शिक्षकांनी उपरोक्त प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये सहभाग नोंदवून आपले शैक्षणिक क्षेत्र वृद्धींगत करावे.

संलग्न - वरीलप्रमाणे.

4/3/2022

**(डॉ. अनिल चिताडे)**
कुलसचिव(प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलिपी:-**

१. मा. कुलगुरु यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरु यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महा. राज्य, पुणे - १
४. मा. सहसंचालक (उच्च शिक्षण), नागपूर विभाग, नागपूर.
५. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना उचित कार्यवाहीस्तव सविनय सादर.
६. मा. विभाग प्रमुख, सर्व पदव्युत्तर शैक्षणिक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
७. सिस्टीम ॲनालिस्ट, संगणक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना सुचित करण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.
८. आस्थापना विभाग(नस्ती), गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

महाराष्ट्र शासन
सहसंचालक (उच्च शिक्षण), नागपूर विभाग,
जुने मॉरीस कॉलेज इमारत, सिताबर्डी, नागपूर - ४४० ००१
Web : www.jdnagpur.in
E-Mail : jdhengp@rediffmail.com E-Mail : jdhengp@gmail.com
फोन नं. ०७१२-२५६१७१३ फॅक्स न. ०७१२-२५५४२१०

क्रमांक : उशिनाग/आस्था/सुचना/५८८/२०२२ दिनांक : ०८/०२/२०२२

प्रति,

१. कुलसचिव,
सर्व अनुदानित अकृषी विद्यापीठे, नागपूर विभाग,

२. संचालक/प्राचार्य,
सर्व शासकीय संस्था/महाविद्यालय, नागपूर विभाग.

३. प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित महाविद्यालये,
नागपूर विभाग,नागपूर

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. ...... दि. ...........
जावक क्र. १११४ दि. २३/२/२२

**विषय : महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था,पुणे व आयसर पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित प्रशिक्षण कार्यक्रमात सहभाग घेणेबाबत...**

संदर्भ : १. उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय दि.०८.०३.२०१९ व दि.२४.१२.२०२१.
२. संचालनालयाचे पत्र क्र.उशिसं/२०२२/प्रशिक्षण/मवि-१/१२०५, दि.०८.०२.२०२२.

उपरोक्त विषयांकित प्रकरणी उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय दि.०८.०३.२०१९ मधील परिच्छेद २३(vii) व (viii) नुसार विद्यापीठे/महाविद्यालये/शैक्षणिक संस्था मधील नवनियुक्त सहाय्यक प्राध्यापकांची १ महिना कालावधीचा Induction Programme मध्ये सहभाग नोंदवून पुर्ण करणेबाबत नमुद आहे. तसेच सदरचा Induction Programme हा UGC/HRDC मार्फत आयोजित करण्यात येत असलेल्या उद्बोधन वर्गाशी समकक्ष समजून त्यास कॅस योजनेतंर्गत स्थाननिश्चितीसाठी ग्राह्य धरणेबाबत तरतुद नमुद आहे. तसेच शासन निर्णय दि.२४.१२.२०२१ नुसार महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था, पुणे यांचेमार्फत राबविण्याबाबत येणारे प्रशिक्षणास कॅस योजनेतंर्गत स्थाननिश्चितीसाठी आवश्यक असलेल्या प्रशिक्षण वर्गास समकक्ष धरण्यास सदर शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था, पुणे व आयसर पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित प्रशिक्षण कार्यक्रमात सहभाग घेणेबाबत प्रस्तुत विभागातील वरिष्ठ महाविद्यालयातील शास्त्र शाखेतील विषय शिकवणाऱ्या शिक्षकांचा अल्प प्रतिसाद दिसून येत आहे. उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांनी महाविद्यालयातील शास्त्र शाखेतील विषय शिकविण्याऱ्या शिक्षकांनी उपरोक्त उल्लेखित प्रशिक्षण वर्गास जास्तीत जास्त संख्येन सहभाग घेण्याबाबत सुचना दिलेल्या आहेत. तथापी, आपल्या महाविद्यालयातील शास्त्र शाखेतील विषय शिकविणाऱ्या शिक्षकांना त्याबाबतच्या सुचना देण्यात याव्या व सदर प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल प्रस्तुत कार्यालयास सादर करावा.

(डॉ.संजय ठाकरे)
सहसंचालक उच्च शिक्षण,
नागपूर विभाग, नागपूर.

प्रत : १. मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.
२. मा.शिक्षण संचालक उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-०१.
३. मा.कार्यकारी संचालक महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था, पुणे.

d:\letter .doc

DR(Estt) Pl. issue circular
21.2.2022

सोपवा
24.2.2022